**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.**
**कोकण परिमंडळ कार्यालय**
**ग्राहक तक्रार निवारण मंच रत्नागिरी**

---

**ग्राहक तक्रार क्र. ०४/२०१७ दाखल दि. २४.०३.२०१७**

| | |
|---|---|
| श्री. सरपंच ग्रामपंचायत धोपेश्वर<br>पन्हळे तर्फ राजापूर<br>जि. रत्नागिरी | तक्रारदार ग्राहक |

**विरुध्द**

| | |
|---|---|
| कार्यकारी अभियंता, महावितरण<br>विभागीय कार्यालय रत्नागिरी | विरुध्द पक्षकार |
| फोरम उपस्थिती | १) वि.श. गुळवणी<br>अध्यक्ष<br>२) श्री. एस. एस. तायडे,<br>प्रभारी सचिव तथा कार्यकारी अभियंता |
| ग्राहकाच्या वतीने | १) श्री. जयंत पुरुषोत्तम बिवलकर<br>(प्रतिनिधी) |
| विरुध्द पक्षकाराच्या वतीने | अनुपस्थित |

**महाराष्ट्र वीज नियामक आयोग , [ ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल (ओम्बुडस्मन) ] विनियम २००६ मधील ६.५ चे तरतुदीनुसार :**

## न्यायनिर्णय

ग्राहक तक्रार निवारण मंच, कोकण परिमंडल,रत्नागिरी खालीलप्रमाणे निर्णय जाहीर करीत आहे.

१) तक्रारदार यांनी सदरचे गाऱ्हाणे त्यांना त्यांच्या ग्राहक क्र. २१४४६७०००८५३ या वीजजोडणीवर दिलेले डिसेंबर २०१६ चे वीजदेयक रद्द करुन त्याची योग्य आकारणी करावी याबद्दल तसेच त्यांना बेकायदेशीरपणे नोटीस दिल्याचे कारणावरून संबंधीत अधिकाऱ्यावर कारवाई करणेबद्दल आणि नुकसानभरपाईबद्दल या मंचासमोर दाखज केले आहे.

------------------गाऱ्हाण्याचे संक्षिप्त स्वरुप-----------

२) तक्रारदार गटग्रामपंचायत धोपेश्वर यांची सार्वजनिक नळयोजनेसाठी उपरोक्त वीजजोडणी चालू आहे. सदर वीजजोडणीव्दारे अंदाजे ७५० लोकवस्ती असलेल्या खेडयात पाणीपुरवठा करणेत येतो. तक्रारदार यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांना डिसेंबर २०१६ ची वीजदेयक भरमसाठ आकारणीचे देणेत आले. त्यांनी सदर देयकापोटी रु. ३५००/ Under Protest भरणा केले आहेत. देयकाची उर्वरीत रक्कम भरल्याशिवाय पुढील काळाची देयके विरुद्ध पक्षकार स्विकारत नाहीत. विरुद्ध पक्षकार यांनी मार्च २०१७ मध्ये तथाकथित थकबाकीसाठी वीजपुरवठा खंडीत करणेबद्दलच्या नोटीसा तक्रारदार यांना दिल्या. तक्रारदार यांनी वेळोवेळी विरुद्ध पक्षकार यांना पाठवलेल्या पत्रांची दखल घेणेत आली नाही. विरुद्ध पक्षकार यांना पाठवलेल्या पत्रांची दखल घेणेत आली नाही. म्हणून दि.२४.०३.२०१७ रोजी सदर गाऱ्हाणे या मंचासमोर दाखल करण्यात आले आहे. (तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष यांचेकडे अर्ज दाखल केलेला होता.)

३) या प्रकरणात उभय पक्षकारांतर्फे युक्तिवाद ऐकून दि. ३०.०३.२०१७ रोजी अंतरीम आदेश करणेत आला.

---------------- वितरण कंपनीची भूमिका-----------

४) विरुद्ध पक्षकार तर्फे कोणताही लेखी खुलासा याकामी दाखल करणेत आला नाही. तथापि, एकंदरीत विरुद्ध पक्षकार यांचेतर्फे असे म्हणणे होते की तक्रारदार यांचे वीजमीटर व्यवस्थित चालू असून त्यात काही दोष नाही. डिसेंबर २०१६ चे वीजदेयक मीटररिडींगप्रमाणे बरोबर दिले आहे.

५) या प्रकरणाची सुनावणी आज दि. २५.०५.२०१७ रोजी घेणेत आली. तक्रारदारातर्फे प्रतिनिधी श्री. जयंत बिवलकर यांचे तोंडी निवेदन ऐकणेत आले. उपलब्ध कागदपत्रे वाचणेत आली आहेत. विरुद्ध पक्षकारातर्फे कोणीही हजर नाही.

६) या मंचाच्या निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात.

१) तक्रारदार यांनी त्यांच्या तक्रार अर्जात केलेली मागणी (विनंती) मंजूर करता येईल काय?
उत्तर- शेवटी नमूद केलेप्रमाणे.

२) कोणता अंतिम आदेश?
उत्तर- शेवटी नमूद केलेप्रमाणे

---------------कारणमिमांसा--------------

७) या प्रकरणात,तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे दि.२४.०३.२०१७ रोजी गाऱ्हाणे दाखल करुन या मंचाकडे अंतरीम आदेश मिळणेचा अर्ज सादर केला होता. दि.३०.०३.२०१७ रोजी या मंचाने अंतरीम आदेश पारीत केला.

८) तक्रारदारतर्फे प्रतिनिधी यांनी आज तोंडी निवेदन दिले की तक्रारदार यांना डिसेंबर २०१६ चे वादग्रस्त देयक पूर्णत: अमान्य असूनही कोणीतरी श्री. सागर सुधीर पडवे यांनी तथाकथित सामाजिक जाणीवेच्या भावनेने दि.३१.०३.२०१७ रोजी वादग्रस्त देयकापोटी उर्वरीत रु.४९१०/-. विरुद्ध पक्षकाराकडे भरणा केली आहेत. त्यामुळे सदरच्या वादग्रस्त डिसेंबर २०१६ च्या वीजदेयकाचा वादाचा विषय सध्या शिल्लक राहिला नाही.

९) तक्रारदारातर्फे प्रतिनिधी यांनी तक्रारदार यांच्या वीजमीटरबाबत व त्याच्या रिडींग घेणेच्या पध्दतीबाबत काही प्रमाणात युक्तिवाद केला. त्यांनी सांगितले की एप्रिल २०१७ चे वीजदेयक २८०० पेक्षा जादा युनिट वापराचे अवास्तव व अयोग्य आले आहे, तथापि, एप्रिल २०१६ च्या देयकाचा विषय या प्रकरणात विचारात घेता येणार नाही. त्याबाबत तक्रारदार यांना जरुर ती कायदेशीर कारवाई करता येईल.

१०) वरील परिच्छेद -८ मध्ये नमूद केले कारणास्तव डिसेंबर २०१६ च्या वीजदेयकाबाबत मागितलेली दाद विचारात घेण्याचे आता कारण राहिले नाही. बेकायदेशीर नोटीस (वीजपुरवठा खंडीत करणेबाबत) रद्द करणेबद्दलची आणि मानसिक त्रासाबद्दल झालेल्या भरपाईची मागणी तक्रारदार तर्फे प्रतिनिधी या मंचापुढे आता Press करीत नाहीत. दि. ३०.०३.२०१७ चा अंतरीम आदेश कायम व्हावा अशी विनंती ते करतात. यावरुन खालील अंतिम आदेश करणेत येतो.

## आदेश

**१) दि. ३०.०३.२०१७ च्या अंतरीम आदेशातील क्र. १ आणि २ यामध्ये नमूद केलेला अंतरीम आदेश, मा. विद्युत नियामक आयोगाच्या नियमांचे आणि कायद्याच्या तरतूदींचे पालन करणेच्या शर्तीवर, याव्दारे कायम करणेत येतो. इतर मागण्या तक्रारदार यांनी सोडून दिल्यामुळे वरीलप्रमाणे हे प्रकरण निकाली काढणेत येते.**

**२) या आदेशाविरुध्द अर्जदारास अपील करावयाचे असल्यास खालील पत्त्यावर हा आदेश मिळाल्यापासून ६० दिवसात अपील दाखल करता येईल.**

**पत्ता :- सचिव,**
**विद्युत लोकपाल**
**महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग,**
**६०६/६०८, केशवा,**
**बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, मुबंई ४०००५**
**फोन नं. ०२२- २६५९२९६५**

**वि. श. गुळवणी**
**अध्यक्ष,**
**ग्रातनिमं,कोकण परिमंडल**

**श्री .एस.एस.तायडे**
**प्रभारी सचिव / कार्यकारी अभियंता**
**ग्रातनिमं, कोकण परिमंडल**

**दिनांक :- २५.०५.२०१७**
**ठिकाण :- रत्नागिरी.**